महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये वाटणीपत्राचा आदेश व वाटप आदेशाचे अनुषंगाने नोंदविलेला फेरफार क्र.६९४४ ची नोंद मंजूर करण्याच्या मंडळ अधिकारी माडग्याळ यांच्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

२. उक्त वाटपपत्राच्या आदेशाने जाबदार क्र. ०१ ते ०६ व ०८ यांचेमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ प्रमाणे वाद मिळकतीचे वाटप करणेत आले आहे. मा.दिवाणी न्यायालय जत येथील रे.दि.मु.नं. २१३/२०१२ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सदर वादमिळकतीमध्ये अपिलार्थी व जाबदार क्र. ०१ यांना ७/३६ येणा-या मिळकतीपैकी प्रत्येकी १/३ हिस्सा आहे. व सदरचे वाटपाकरीता दि.प्र.स.कलम ५४ अन्वये मा.जिल्हाधिकारी सांगलीकडे पाठविणेबाबत आदेश दिनांक २९/०१/२०१८ रोजी झालेला असून सदर आदेशात दिनांक ०९/०९/२०२१ रोजी दुरुस्ती होऊन मा. जिल्हाधिकारी सांगली बरोबर मा.जिल्हाधिकारी सोलापुर यांचे नाव नमूद करणेत आले आहे.

३. सदर मा.दिवाणी न्यायालय जत येथील रे.दि.मु.नं. २१३/२०१२ चा आदेश आजअखेर कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही. याचाच अर्थ मा.दिवाणी न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे वाटप होऊन अपिलार्थी यांना हिस्सा मिळणेपुर्वी जाबदार ०१ ते ०६ व ०८ यांनी केलेले महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५(२) प्रमाणेचे वाटप हे सदोष असून ते रद्द होणेस पात्र आहे. त्यामुळे वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचा एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांचे अपिल मान्य करणे आवश्यक आहे असे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज मान्य करणेत येवून अपर तहसिलदार संख यांचेकडील क्र.हनो/वाटप/एसआर/२२०/२०२२, दिनांक १८/१०/२०२२ रोजीचा आदेश रद्द करणेत येत आहे. तसेच सदर वाटपाचे आदेशाचा मौजें जाडरबोबलाद ता.जत येथील फेरफार क्र.६९४४ ची नोंद रद्द करणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

सदर आदेशाचा अंमल अपिल कालावधिनंतर करणेत यावा.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

**(अजयकुमार नष्टे)**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२८.०३.२०२५

प्रत - अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

असा आदेश झालेला आहे. हे माहित असतानाही केवळ अपेलंट यांचे नुकसान करावे म्हणून कमी प्रतिची तसेच कमी जमिन जाबदार नं १ यांच्या नावे घातली आहे. तसेच सदर कोर्टाच्या आदेशामध्ये जे सहहिस्सेदार आहेत इतर लोकांची नावे नमूद करून अपर तहसलदार जत यांची दिशाभूल करून जो वाटपाचा आदेश घेतलेला आहे तो चुकीचा आहे त्यामुळे तो रदद होणे गरजेचे आहे.

**जाबदार यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट यांनी केलेले अपील व त्यासोबतचे स्थगिती अर्जातील संपूर्ण मजकूर जाबदार नं. १ यांना मान्य व कबूल नाही. अपेलंट हीस क्र.हनों/वाटप/एस.आर./२२०/२०२२ चे काम चालू असलेबाबतचे संपूर्ण माहिती होती. तरी देखील सदर कामी स्वतःहून हजर होवून कोणतीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे सदरकामातील दिनांक: १८/१०/२०२२ रोजीचा आदेश तिचेवर बंधनकारक आहे.

२. अपेलंट यांनी अपीलामध्ये नमुद केलेप्रमाणे आर.सी.एस. नं. २१३/२०१२ चे निकाल दिनांकः २९/०१/२०१८ रोजी झाला असून, सदरचे निकाल झालेनंतर जाबदार नं. १ हे अपेलंट यांचेकडे जावून तुमच्या हिश्यास येणारी जमीन तुमच्या नांवे करतो तसेच कोर्टाचे आदेशही झालेले आहेत व माझ्या हिश्यास असणारी जमीन मला राह दे असे म्हणाले होते, परंतु त्यास अपेलंट यांनी स्पष्टपणे नकार दिला व मला तुमच्या गावाकडे यायचे नाही असे म्हणाल्या.

३. त्यानंतर वेळोवेळी जाबदार नं. १ यांनी अपेलंट यांना तुमच्या हिश्यास येणारी जमीन तुम्ही तुमच्या नावावर करुन घ्यावी अशी विनवनी केली असता, अपेलंट यांनी त्यास टाळाटाळ करु लागले, कारण जाबदार नं. १ यांची तब्येत खराब आहे. त्यांना सततचा दवाखाना असतो आज ना उद्या जाबदार नं. १ हे मयत पावल्यावर त्यांच्या हिश्याची संपूर्ण जमीन आपणास मिळेल. या दृष्ट हेतुने अपेलंट हे कोर्टाचे आदेशाप्रमाणे वाटप करुन घेणेस टाळाटाळ करीत होती.

४. अपेलंट यांनी दाखल केलेले रे.दि.मु.नं.२१३/२०१२ तसेच किरकोळ डायरी नं. १/२०२० दोन्हीही कामामध्ये एकतर्फा आदेश झालेला असून त्यामध्ये जाबदार नं. १ यांच्या हिस्सेतील १/३-१/३ दोन्ही अपेलंट यांना वाटप देणेबाबतचे आदेश झालेले आहे. अपेलंट यांच्या या कृतीमुळे जाबदार नं. १ तसेच जाबदार नं. २ व ३ यांना सदर मिळकतीमध्ये कोणतेही सुधारणा किंवा त्याचा उपभोग घेता येत नव्हता त्यामुळे जाबदार नं. १ ते ६ यांनी मे. अप्पर तहसिलदार सो, संख यांचेकडे वाटपाचे काम दाखल केले व त्याबाबची माहिती अपेलंट्स यांना देण्यात आली. तरी देखील अपेलंट यांनी त्याकामात हजर होवून म्हणणे देण्यास टाळाटाळ केली.

५. सद्यपरिस्थितीला अपेलंट यांनी अपर तहसिलदार, संख यांचेकडे झालेल्या आदेशानुसार आप-आपली जमीन सुधारणा करुन त्या सुधारणेसाठी बराच खर्च केलेला आहे. अपेलंट यांना माहित असून देखील अपर तहसिलदार, संख येथे चालू असलेल्या वाटपाच्या कामकाजामध्ये कोणतीही तक्रार केलेली नाही. त्यामुळे अपेलंट हिस दिनांकः १८/१०/२०२२ अपर तहसिलदार, संख यांनी केलेल्या आदेशावर कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत घेता येत नाही.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांच लेखी युक्तिवाद, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथील वाद मिळकतीसंदर्भात अपर तहसिलदार संख यांचेकडील आदेश क्र.हनो/वाटप/एसआर/२२०/२०२२, दिनांक १८/१०/२०२२ अन्वये महाराष्ट्र जमीन

नोंदविलेला फेरफार क्र.६९४४ ची नोंद मंजूर करण्याच्या मंडळ अधिकारी माडग्याळ यांच्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकतीबाबत तसेच मौजे मारोळी ता. मंगळवेढा येथील ग.नं. ७५ बाबात अपेलंट यांनी जत येथील मे.दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं.२१३/२०१२ हा दावा दाखल केला होता तो दावा मंजूर ही दि.२९/०१/२०१२ रोजी आहे व वाटपाचा हुकूम नामा झाला आहे. सदर वाटपाचा आदेश वा हुकूम नामा आव्हानीत व रदद झालेला नाही.

२. सदर दावेच्या हुकूम नाम्याच्या वेळी जत तालुक्यातील जमिनीबाबत मे. कलेक्टर सांगली यांना सि.पी.सी. कलम ५२ प्रमाणे वाटप करणेचा आदेश झाला होता परंतु अनावधानाने मौजे मारोळी ता. मंगळवेढा बाबत मे. कलेक्टर सोलापूर हे लिहीणे हुकूम नाम्यात लिहीणे मे. कोर्टाकडून राहून गेले होते. अपेलंट यांनी पुन्हा जत येथील मे दिवाणी न्यायालयात दिवाणी किरकोळ डायरी नं १/२०२० हा त्याकामी दाखल केला होता तो दि. ०९/०९/२०२१ रोजी मंजूर झाला आहे. सदर बाबत उतारे काढून अपेलंट हे मे दिवाणी न्यायालयात हुकूमनामा बजावणी कामी अर्ज देणार होते.

३. दरम्यानच्या काळात यातील सर्व जाबदार यांनी मिळून मे. कोर्टाचा झालेला हुकूम माहिती असतानाही व त्या हुकूम नाम्यामध्ये मे कोर्टाने अपेलंट यांचा हिस्स्याचे वाटप करून कब्जा देईपावेतो कोणत्याही प्रकारे तबदीली करू नये असा आदेश असतानाही सर्वांनी संगनमत करून मे. तहसिलदारसो जत यांची दिशाभूल करून अपेलंट यांच्या अपरोक्ष क्र.हनो/वाटप/एसआर/२२०/२०२२ दाखल करून दि १८/१०/२०२२ रोजी आदेश घेतला व त्या आदेशा वरून फे.नं. ६९४४ चे मंडळ अधिकारी माडग्याळ यांनी मंजूर केला.

४. जाबदार नं. २ ते ६ यांनी दि. ०५/०३/२०२४ रोजी जे म्हणणे दाखल केलेले आहे त्यामध्ये त्यांनी चुकीचे मांडलेले आहेत. सदर जाबदार हे तहसिलदार जत यांच्याकडे वाटप करून घेत असताना अपेलंट यांना कोणत्याही प्रकारची नोटीस व पक्षकार केलेले नाही. जाबदार यांनी केवळ अपेलंट यांचा हक्क व हिस्सा बुडवावा व कायदयाने जेवढा दिला आहे तेवढा देऊ नये म्हणून जाणून बुजून जाबदार नं १ यांच्या हिस्स्यास कमी प्रतिची तसेच खराब जमिन वाटपास घातलेली दिसतो व त्यातच वाटून घ्यावे असे म्हणत आहे. मे. दिवाणी कोर्टाचा आदेश डावलून तसेच मे. महसूली अधिकाऱ्यांची दिशाभूल करून सदरचे वाटप करून घेतले असलेने तो रदद होणेस पात्र आहे.

५. जाबदार नं. १ यांनी हजर होऊन जे म्हणणे दि. ०३/०९/२०२४ रोजी दाखल केलेले आहे ते पाहता त्यांना अपेलंट यांनी केलेले दावे तसेच किरकोळ अर्ज याची संपूर्ण माहिती होती व मे. दिवाणी कोर्टाने रे.दि.मु.नं. २१३/२०१२ मध्ये केलेल्या हुकूमनाम्याचीही माहिती होती. हे स्पष्ट होते. तसेच त्यांचे म्हणणेतील पॅरा ३ मधील मजकूर पाहता त्यामध्ये त्यांनी सदरचे निकाल झालेनंतर अपेलंट यांच्याकडे जाऊन तुमच्या हिस्स्याची जमिनी तुमच्या नावे करतो तसेच मे. कोर्टाचे आदेशही झालेले आहेत व माझ्या हिस्स्यास असणारी जमिन मला राहू दया असे म्हणाले होते ही बाब पाहता "देखील कोर्टाचा वाटपाचा आदेश झालेला आहे व वाटप होई पावेतो कोणत्याही प्रकारचे फेरबदल करू नयेत

**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**
दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. आरटीएस/अपील/४०/२०२३
दिनांक-२८.०३.२०२५

**प्रति,**

१. कावेरी सिदनिंगाप्पा रवि
२. निर्मला सिदनिंगाप्पा रवि
अ.क्र ०१ चे अपाक अ.क्र. २
दोघे रा.सोन्याळ, ता. जत, जि. सांगली.... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सिदनिंगाप्पा आडव्याप्पा रवी
२. मलिकाण्णा आडव्याप्पा रवि
३. हणमंत आडव्याप्पा रवि
४. लक्ष्मीबाई आडव्याप्पा रवि
५. आंबव्वा निंगाप्पा बिरादार
५/१ राजु निंगाप्पा बिरादार
५/२. रविंद्र ऊर्फ रवाप्पा निंगाप्पा बिरादार
५/३. शिवानंद निंगाप्पा बिरादार
६. सिध्दनिंगव्वा विजन्ना बिराजदार
७. महादेव ईश्वराप्पा बिराजदार
७/१. निंगाप्पा ईश्वराप्पा बिराजदार
७/२. श्रीशैल ईश्वराप्पा बिराजदार
७/३. सिद्राया ईश्वराप्पा बिराजदार
७/४. गुरुसिध्दाप्पा ईश्वराप्पा बिराजदार
७/५. भौरम्मा साताप्पा आरणी
७/६. लक्ष्मीबाई आडव्याप्पा रवि
७/७. निलम्मा ईश्वराप्पा बिराजदार
८. शोभा हणमंत रवि

अ.क्र. १ ते ४ व ८,७/५ व ७/६ रा. जाडरबोबलाद,ता. जत जि.सांगली
अ.क्र. ५/१ ते ५/३ व ७/१ ते ७/४ व ७/७ रा. सोड्डी ता. मंगळवेढा
अ.क्र. ६ रा. रेवतगावं, ता. इंडी, जि. विजयपुर ..... **जाबदार**

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे निकालपत्र

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाबाबतचा फेरफार नंबर |
|---|---|---|---|---|---|
| जाडरबोबलाद | जत | ६५६ | ० हे. ५५ आर. पो.ख ० हे. ०० आर. | संपुर्ण हिस्सा | ६९४४ |
| | | ६५८ | ० हे ९२ आर पो.ख. ० हे ०० आर | संपुर्ण हिस्सा | |
| | | ३०२ | १ हे ४७ आर पो.ख. ० हे ११ आर | संपुर्ण हिस्सा | |

मौजे जाडरबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथील वाद मिळकतीसंदर्भात अपर तहसिलदार संख यांचेकडील आदेश क्र.हनो/वाटप/एसआर/२२०/२०२२, दिनांक १८/१०/२०२२ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये वाटणीपत्राचा आदेश व वाटप आदेशाचे अनुषंगाने